अंबरनाथ वाहतूक उप विभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसूचना

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.deptraffic@mahapolice.gov.in

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ २७४ /२०२५ दि. १७ /१२/२०२५

–: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :–

ज्याअर्थी, अंबरनाथ वाहतूक उपविभागाचे हद्दीत स्थानिक स्वराज्य संस्था अंबरनाथ नगरपरिषद निवडणुक २०२५ चा दि. २१/१२/२०२५ रोजी निकाल लागणार असुन अंबरनाथ, बदलापुर शहरामध्ये अवजड वाहनांची वर्दळ जास्त असते तसेच कल्याण उल्हासनगर मधुन बदलापुर कडे जाणारे मुख्य रोडवर महात्मा गांधी चौक, अंबरनाथ पश्चिम येथील महात्मा गांधी विद्यालय येथे स्थानिक स्वराज्य संस्था अंबरनाथ नगरपरिषद मतदार संघाचे स्ट्रॉग रूम आहे. सदर ठिकाण राज्य महामार्ग क्र. ७६ लगत रोडवर आहे. मतमोजणी च्या दिवशी स्ट्रॉग रूमचे ठिकाणी उमेदवार तसेच त्यांच्या सोबत कार्यकर्त्यांची मोठया प्रमाणात गर्दी होणार असल्याने वाहतुक कोंडी न होण्यासाठी पर्याय म्हणुन शहरामधुन जाणारी सर्व प्रकारची वाहने मोटर सायकल, रिक्षा तसेच छोटी चारचाकी व जड अवजड वाहने ही शहराच्या बाहेरच्या रस्त्याने वाहने वळण्यात येणार असल्याने सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

त्याअर्थी, मी पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम. व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढील प्रमाणे अधिसुचना जारी करीत आहे:–

प्रवेश बंद–	१) बदलापुर व अंबरनाथ शहरामधुन उल्हासनगर, कल्याण कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **(त्यामध्ये विमको नाका, लादी नाका, डी.एम.सी. चौक, अंबरनाथ पश्चिम रेल्वे स्टेशन पर्यत जाणारे मोटार सायकल, रिक्षा व छोटी चारचाकी वाहने वगळुन) फॉरेस्ट नाका** येथे **''प्रवेश बंद''** करण्यात येत आहे.
पर्यायी मार्ग–	सदरची वाहने फॉरेस्ट नाका येथुन डाव्या बाजुने वळुन पुढे टी पॉईंट वैभव हॉटेल पुढे नेवाळी नाका मार्गे कल्याण व उल्हासनगर इच्छीत स्थळी जातील.
प्रवेश बंद–	२) बदलापुर व अंबरनाथ मधुन उल्हासनगर व कल्याण येथे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **डी.एम.सी. चौक** येथे **''प्रवेश बंद''** करण्यात येत आहे.
पर्यायी मार्ग–	सदरची वाहने डी.एम.सी. चौक येथुन डाव्या बाजुला वळण घेवुन अंबरनाथ पोलीस ठाणे पुढे पोलीस पेट्रोल पंप येथुन उजवे बाजुला वळण घेवुन अंबरनाथ रेल्वे स्टेशन व पुढे इच्छीत स्थळी जातील.
प्रवेश बंद–	३) उल्हासनगर येथुन मटका चौक मार्गे अंबरनाथ शहरामध्ये तसेच बदलापुर, कर्जत कडे येणारी जड अवजड वाहने यांना **१७ सेक्शन** येथे **''प्रवेश बंद''** करण्यात येत आहे.
पर्यायी मार्ग–	सदरची वाहने उल्हासनगर येथुन श्रीराम चौक, चक्की नाका मार्गे डावे बाजुने वळुन पुढे नेवाळी नाका मार्गे बदलापुर व कर्जत इच्छीत स्थळी जातील.
प्रवेश बंद–	४) उल्हासनगर येथुन मटका चौक मार्गे अंबरनाथ शहरामध्ये, अंबरनाथ रेल्वे स्टेशन तसेच बदलापुर, कर्जत कडे येणाऱ्या ऑटोरिक्षा, मोटार सायकल व छोटी वाहने यांना **मटका चौक** येथे **''प्रवेश बंद''** करण्यात येत आहे.
पर्यायी मार्ग–	सदरची वाहने मटका चौक येथुन उजव्या बाजुला वळण घेवुन हुतात्मा चौक मार्गे अंबरनाथ रेल्वे स्टेशन येथे जातील तसेच हुतात्मा चौकातुन लोकनगरी मार्गे वैभव हॉटेल पुढे डावे बाजुने वळन घेवुन अंबरनाथ तसेच बदलापुर व कर्जत इच्छीत स्थळी जातील.
प्रवेश बंद–	५) अंबरनाथ रेल्वे स्टेशन पश्चिम कडुन महात्मा गांधी चौकाकडे येणाऱ्या ऑटोरिक्षा, मोटारसायकल व इतर सर्व प्रकारच्या वाहनांना **सुश्रुत हॉस्पीटल समोर गांधी चौकाकडे जाणाऱ्या रोडवर व छत्रपती शिवाजी महाराज भाजी मार्केट समोर नारायण टॉकिज कडे जाणाऱ्या रोडवर ''प्रवेश बंद''** करण्यात येत आहे.
पर्यायी मार्ग–	**अ)** अंबरनाथ रेल्वे स्टेशन पश्चिम सुश्रुत हॉस्पिटल मार्गे उजवीकडे छत्रपती शिवाजी महाराज भाजी मार्केट – पोलीस पेट्रोलपंप येथुन डावीकडे वळुन – डि.एम.सी. चौक मार्गे इच्छीत स्थळी जातील. **ब)** अंबरनाथ रेल्वे स्टेशन – डि.एम.सी. कंपनीचे मागील बाजुकडील रोड पुढे जावुन डावीकडे ग्लोबल बिजनेस पार्ककडे कल्याण – बदलापुर रोडकडे निघणाऱ्या रोड वरून इच्छीत स्थळी जातील.

प्रवेश बंद–	६) वैभव हॉटेल येथुन लोकनगरी मार्गे मटका चौक या दिशेने येणारी सर्व प्रकारची वाहने तसेच जड अवजड वाहने **(त्यामध्ये लोकनगरी, समर्थ चौक, हुतात्मा चौक, अंबरनाथ पुर्व रेल्वे स्टेशन, उल्हासनगर, कल्याण कडे जाणारे मोटार सायकल, ऑटोरिक्षा व छोटी चारचाकी वाहने वगळुन)** यांना **वैभव हॉटेल** येथे **"प्रवेश बंद"** करण्यात येत आहे.
पर्यायी मार्ग–	सदरची जड अवजड वाहने वैभव हॉटेल पासुन पुढे सुदामा हॉटेल मार्गे फॉरेस्ट नाका तसेच वैभव हॉटेल कडुन नेवाळी नाका मार्गे ईच्छीत स्थळी जातील.

सदरची वाहतूक नियंत्रण अधिसुचना ही दिनांक २१/१२/२०२५ रोजी सकाळी ०६:०० पासुन ते रात्री २०:०० वा. पावेतो अंमलात राहील.

सदरची वाहतुक अधिसुचना ही पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रूग्णवाहिका व निवडणुकीची वाहने तसेच इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू होणार नाही.

(पंकज शिरसाट)
पोलीस उप आयुक्त,
वाहतुक विभाग, ठाणे शहर

प्रति,

जिल्हा प्रसिध्दी अधिकारी, ठाणे

२/– सदरची अधिसुचनेस प्रसिध्दी देणेस विनंती आहे.

प्रत माहितीसाठी सादर

मा.पोलीस आयुक्त,ठाणे शहर
मा.पोलीस सह आयुक्त,ठाणे शहर
मा.अपर पोलीस आयुक्त, पुर्व प्रादेशिक विभाग, ठाणे शहर.
मा.आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर.
मा.जिल्हाधिकारी, ठाणे

प्रत कार्यवाहीसाठी :–

उप प्रादेशिक परिवहन अधिकारी ,कल्याण
विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन, कल्याण/विठ्ठलवाडी.
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–४ उल्हासनगर व विशेष शाखा, ठाणे
प्रत:– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर

२/– सदरची अधिसुचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

प्रत :– समन्वय अधिकारी, ९ ए.एस.कक्ष,ठाणे

२/– सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

प्रत :– सपोआ वाहतूक विभाग, उल्हासनगर व सर्व संबंधीत प्रभारी अधिकारी, वाहतूक उपविभाग.

२/– म.न.पा.उल्हासनगर च्या संबंधीत अधिकाऱ्यांकडून आवश्यक ठिकाणी सुचना फलक लावून घ्यावीत.